# राष्ट्रीय बाल श्रम परियोजना व कायद्यांचा अभ्यास

संशोधक
**धाये गणेश मधुकरराव**
संशोधन केंद्र
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना**

बालकांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक व सामाजिक क्षमतांचा योग्य प्रकारे विकास घडवून आणणे महत्त्वाचे असते. दारिद्रयामुळे पालकांना आपल्या पाल्यांना श्रमबाजारात पाठवणे भाग पडते. गरीब कुटुंबातील मुलांना आपल्या कुटुंबाच्या गरजांच्या पूर्तिसाठी आर्थिक हातभार लावावा लागतो. बालकामगार ही मूळातच दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, शिक्षणाचा अभाव व शिक्षणाच्या अपूऱ्या सोयी, वाढती लोकसंख्या, सध्याची अनाकर्षक शिक्षण व्यवस्था, औद्योगिकरण, मुलांची अर्थाजनाची, मानसिकता, उध्वस्त कुटुंव इत्यादी समस्येतून निर्माण झालेली सामाजिक समस्या होय. बालमजूर हे सर्वत्र विखुरलेले व असंघटित आहेत. म्हणूनच त्यांच्या सर्व समस्यांचे गांभिर्य जितक्या प्रकर्षाने समाजापूढे यायला हवे तितके ते आलेले नाही. ज्या कामामुळे मुला-मुलींना शिक्षण व मनोरंजन या सारख्या प्राथमिक गरजांपासून वंचित व्हावे लागते. जे काम मुलांच्या आरोग्याला घातक ते काम करणे जेव्हा मुलांना भाग पडते तेव्हा ते बालश्रम होय. त्यात त्यांची पिळवणूक सुध्दा केली जाते. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेनुसार आपल्या शारीरिक व मानसिक विकासाला क्षति पाहोचवून १४ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी वयातच वयस्क व्यक्तिप्रमाणे काम करणाऱ्यांना बालश्रमिक म्हणतात.

सुरुवातीला स्त्री बालमजुर ऐवजी बालमजुर या समस्येची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने विविध दृष्टिकोनातून कायदे करण्यात आले आहेत. नंतरच्या काळात स्त्री व पुरुष बालकामगार असे वेगळे कायदे व अभ्यास करणाऱ्या विविध संघटना निर्माण झाल्या. आज भारतातील सर्वत्र महिला बालकामगार ही एक प्रमुख समस्या बनली आहे. शासनाने या समस्येचे निमूर्लन करण्यासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलले आहेत. या समस्येने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. महिला बालकामगार गरीबी आणि निरक्षर या समस्येने देखील गांजले आहेत. त्यामुळे या समस्येचे निर्मूलन करण्यासाठी शासन आणि समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. महिला बालकामगार समस्या निकाली काढण्यासाठी भारत सरकारने १९७९ मध्ये गुरुपाद स्वामी समिती स्थापना केली होती. या समितीने महिला बालकामगार विषयी सखोल अध्ययन करुन अंतिम शिफारशीचा अहवाल शासनाकडे सर्पूद केला. यांनी निष्कर्षात म्हटले की, जोपर्यंत समाजात गरीबीची समस्या राहणार आहे तोपर्यंत महिला कामगार समस्येचे निर्मूलन होणार नाही. यामुळे धोकाधायक कंपन्या, कारखाने इत्यादी ठिकाणी महिला बालकामगार ठेवण्यासाठी बंधन घालावे तसेच काही क्षेत्रामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात असे शिफारशीमध्ये म्हटले. यामुळे कायद्याच्या आधारावर या समस्येचे समाधान करणे गंभीर बाब आहे. भारत सरकारने महिला बालकामगार यांच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी गुरुपाद स्वामी समितीच्या शिफारशीचे १९८६ मध्ये कायद्यात रुपांतर करण्यात आले. या कायद्यानुसार धोकादायक क्षेत्रात महिला बालकामगार यांना काम करण्यास प्रतिबंध करण्यात आले. यानुसार बालश्रम तंत्रज्ञान सलाहगार समितीच्या माध्यमातून नवीन रोजगारांची निर्मिती करण्यात येत आहे. गुरुपाद स्वामी यांच्या शिफारशी नुसारच पुढे १९८७

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

मध्ये राष्ट्रीय बाल मजूरी कायदा तयार करण्यात आला. या कायद्यानुसार धोकादायक क्षेत्रातील बालकामगार यांचे पुनर्भरण करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. राष्ट्रीय बाल श्रम परियोजना संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. स्त्री बाल मजूर संदर्भातील विविध कायद्यांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**राष्ट्रीय बाल श्रम परियोजना कार्यक्रम**

संपूर्ण भारतातील बालकामगारांच्या दृष्टिकोनातून त्यांचे संगोपन करण्यासाठी राष्ट्रीय बाल श्रम परियोजना कार्यक्रम यांच्या माध्यमातून १.५० लाख बालकांचे संगोपन करण्यासाठी ७६ बाल श्रम परियोजनेला मंजुरी दिली आहे. १.५० लाख बाल मुजरी करणाऱ्या बालकांना शाळेतमध्ये समायोजन करुन घेतले आहे. ही योजना आणखी वृध्दीगत करण्यासाठी श्रम मंत्रालयाने योजना आयोगाच्या माध्यमातून देशातील ६०० जिल्ह्यात श्रम परियोजना स्थापन करण्यासाठी १५०० कोटी रुपये देण्याचे मान्य केले आहे. धोकाधायक ५७ उद्योगातील ९ ते १४ वर्षाखालील बालकांना या योजनेखाली आणले गेले आहे. एवढेच नाही सर्व शिक्षा अभियाना सारखी सरकारी योजना देखील लागू केली जात आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये १४ ऑगस्त १९८७ मध्ये राष्ट्रीय वाल श्रम योजनेला मान्यता देण्यात आली. या योजनेनुसार बालकांना रोजगारांपासून विभक्त करुन त्यांचे पुर्नभरण करण्याचे लक्ष्य होते. ज्या उद्योगामध्ये बालकामगारांचे प्रमाण जास्त आहे त्या ठिकाणी बालकामगारांची संख्या कमी करणे असा या योजनेचा मुख्य उद्देश होता.

**१.राष्ट्रीय बाल श्रम परियोजनेचा उद्देश**

१९९१ च्या जनगणनेनुसार देशातील बाल कामगारांची संख्या जवळपास १.१ कोटी एवढी आहे. उपलब्ध साधन सामुग्रीचा तुटवडा आणि सामाजिक जाणिव व जागृतीच्या माध्यमातून १० व्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत शासनाने बाल कामगार संख्या समाप्त करण्याच्या उद्देशाने नियोजन केले आहे.

**२.राष्ट्रीय बाल श्रम परियोजनेचा लक्ष्य**

राष्ट्रीय बाल श्रम योजनेनुसार यामध्ये १४ वर्षाखालील सर्व बाल कामगारांना सामिल केले गेले. बालकामगारांशी संबंधित १९८६ चा कायदा करुन बालकांचा सर्वांगिण विकास करण्याच्या उद्देशाने व्यवसाय, आरोग्य आणि त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत.

**३.रणनीति**

१९९१ च्या जनगणनेनुसार देशात बाल मजदूरी करणाऱ्यांची एकूण संख्या ११.२८ कोटी एवढी होती. तर एनएसएसओ च्या अहवालानुसार १९९९-२००० बाल मजूरांची संख्या एकूण १०.४० कोटी एवढी होती. या कायद्यामध्ये धोकादायक उद्योगावर काम करणाऱ्या मुलांची सुटका करुन त्यांना शाळेमध्ये पाठविण्याची व्यवस्था केली आहे. १० व्या पंचवार्षिक योजनेत शाळेमध्ये व्यावसायिक शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे.

**भारतीय राज्यघटनेत बालकांना दिलेले अधिकार**

ब्रिटिश साम्राज्यात अनेक वर्षे खितपत पडल्यामुळे नागरिकांचे राजकीय, आर्थिक व मानसिक शोषण झाले. त्यामुळे संविधानकारांनी जगातील संपूर्ण संविधानाचा अभ्यास भारतीय जनतेच्या कल्याणासाठी उत्तम अशा तरतुदींचा भारतीय संविधानात समावेश केला. यामध्ये कोणत्याही व्यक्तीचे शोषण होणार नाही असे संविधान तयार

केले गेले. ब्रिटिश साम्राज्यामध्ये बालकामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण झाल्यामुळे बालकांच्या अधिकारांसाठी विविध कलमांचा समावेश संविधानात केला. यांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

१. कलम २३ नुसार शोषणाविरुध्दचा अधिकार.
२. कलम २४ नुसार १४ वर्षाखालील मुला-मुलींना कारखाने, विविध खाणी, कंपन्या अशा धोक्याच्या ठिकाणी ठेवण्यास मनाई.
३. कलम ३९ नुसार प्रत्येक व्यक्तींच्या आरोग्याची जबाबदारी सरकारवर राहिल.
४. कलम ३९ ई. नुसार लहान मुला-मुलींना कामावर जूपण्यास आणि वाईट वागणूक देण्यास बंदी.
५. कलम ३९ फ. नुसार मुलांना आरोग्य, स्वतंत्र, स्वच्छता आणि दर्जेदार जीवन जगण्याची संधी मिळावी तसेच कोणत्याही प्रकारची पिळवणूक होणार नाही यासाठी उपाय योजना केल्या आहेत.
६. कलम ४५ नुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुले-मुलींसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला.
७. बाल कामगारांचे उच्चाटन करण्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये कलम २३ ते ४५ मध्ये महत्त्वाच्या कलमांचा समावेश करण्यात आला आहे.

वरील कलमातील तरतुदींचा प्रत्यक्ष रितीने अवलंब केला तर बालमजूरांची समस्या उद्भवणार नाही. कल्याणकारी राज्यांची संकल्पना आज फक्त कागदावरच आहे. त्यामुळे भारत देश स्वतंत्र झाला तेव्हा पासून आजता गायत वरील बालकांच्या हक्कांच्या संदर्भात कोणत्याही तत्त्वांची काटेखोरपणे अंमलबजावणी होत नसल्यामुळे बालमजूरांची समस्या उद्भवली आहे.

**बालमजूर कामगार निर्मूलनासाठी केलेले कायदे**

औद्योगिकीरणामुळे संपूर्ण जगाचे चित्र बदलले आहे. वाढत्या उद्योगधंद्यामुळे कृषीप्रदान अर्थव्यवस्थेचे रुपांतर आता व्यवसाय भिमुख झाले आहे. यामुळे जगाची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढताना दिसून येत आहे. परंतु या अर्थ व्यवस्थेमुळे भारतासारख्या विकसनशील देशात स्त्री बालमजुरांच्या शोषणात वाढ होत आहे. लहाण वयात स्त्री बालमजूर मोठमोठे कारखाने आणि कंपनीमध्ये काम करत आहेत. काम करत असताना वालमजूरांवर कारखाण्यात रसाने, धुर, ध्वनी प्रदुषण इत्यादीचा विपरीत परिणाम बालमजूरांच्या आरोग्यावर होत असल्याने कर्करोग, कॅन्सर सारख्या रोगाना बळी पडावे लागत आहे. भारतामध्ये बालमजूरी विरोधी अनेक संघटना बालमजूरांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढे सरसावल्या आहेत. बालमजूर कामगार यांचे उच्चाटन करण्यासाठी उपाय योजना म्हणून अनेक कायदे तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे पाहता येतील.

**१. १९४८ चा फॅक्टरी अॅक्ट**

या कायद्यांच्या तरतुदी पुढील प्रमाणे करण्यात आल्या आहेत.

१. कारखान्यातील कामासाठी बालमजुरांची किमान वयोमर्यादा १४ वर्षापर्यंत वाढविण्यात आली.
२. १४ ते १७ वयोगटातील मुलांना रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत कामाला बंदी घालण्यात आली.
३. एकाच कारखान्यात मुलांना विविध प्रकारच्या कामावर बंदी.
४. मुलांना धोकादायक मशिनवर कामास बंदी.

१९४८ च्या फॅक्टरी कायद्यानुसार कारखान्यातील बालमजूरांची किमान वयोमर्यादा १४ वर्षापर्यंत वाढविण्यात आली. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत बालकामगार कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली. तसेच बालकामगारांना धोकाधायक व एकाच कारखान्यात अनेक कामावर काम करण्यास बंदी घालण्यात आली. एकंदरी बालकामगार मजूरांचे प्रमाणे कमी करण्यासाठी चांगल्या प्रकारची तरतुद करण्यात आली.

**२. प्लॉन्टेशन लेबर-ॲक्ट १९५१**

प्लॉन्टेशन लेबर ॲक्ट नुसार १२ वर्षाखालील मुलांच्या नोकरीवर बंदी घातलेली होती नंतर चाईल्ड लेबर ॲक्ट ने तो वयोमर्यादा १४ वर्षापर्यंत वाढवली व बालकामगार निर्मूलनार्थ महत्त्वाच्या तरतुदी केल्या.

**३. मार्वन्स-ॲक्ट १९५२**

मार्वन्स कायद्यानुसार भुमिगत असलेल्या कुठल्याही खाणीत लहान मुलांना नोकरीवर घेण्यास व प्रवेशास बंदी करण्यात आली. कारण भूमिगत ठिकाणी म्हणजेच कोणत्याही खाणीत कोंदट वातावरण, अपुरा सुर्यप्रकाश, अशुध्द हवा व धोक्यामुळे मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. त्यामुळे बालकांना वयात फुफुसाचे रोग, दमा, क्षय यासारख्या भयानक रोगांनी ग्रासतो.

**४. १९५८ चा व्यापारी-जडवाहतूक कायदा**

१९५८ च्या कायद्यानुसार लहान मुले ही शारिरीक व मानसिकदृष्ट्या परिपक्व नसतात. त्यामुळे त्यांना नेहमीच प्रौढांच्या आधाराची व मदतीची गरज असते. त्यामुळे १९५८ च्या व्यापारी व जडवाहतूक कायदा करण्यात आला त्यानुसार कायद्यातील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे करण्यात आल्या.

१. व्यापारी जहाजावर १५ वर्षाखालील मुलांना कोणत्याही कामास बंदी.
२. १५ वर्षावरील मुलांनसाठी वैद्यकिय प्रमाणपत्र आवश्यक तसेच ते दर एक वर्षाने नवीन प्रमाणपत्र देण आवश्यक.
३. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास ५०० रुपये इतका दंड.

**५. १९७८ चा बालमजुरी सुधारणा कायदा**

१९७८ च्या बालमजूरी सुधारणा कायद्यानुसार केवळ बालकामगार प्रथेचे निर्मूलन करण्याबरोबर वालकांच्या काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणाही करणे गरजेचे मानले. त्यानुसार कायद्यातील पुढील तरतुदी करण्यात आल्या.

१. विशिष्ट व धोकादायक उद्योगात मुलांना कामासाठी बंदी.
२. कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीचे नियंत्रण.
३. बालक म्हणजे काय त्यात एकसूत्रता आणि मूल म्हणजे ज्यांच्या वयाची १४ वर्षे पूर्ण केली नाहीत. अशा सर्व बालकांना हा कायदा लागू असेल.

**६. महिला बालकामगार प्रतिबंध कायदा १९८६**

१९८६ मध्ये गुरुपदस्वामी कमिटीने मांडलेल्या मुद्यावरुन बालमजूर कायद्याची स्थापना झाली. या कायद्यांतर्गत कोणत्याही लहान मुलांच्या आरोग्यावर परणिाम होईल अशा जागी काम करण्यास त्यांना बंदी घालण्यात आली. कोणते काम हे वालकांच्या आरोग्यासाठी धोकादायक आहे यांची यादी वालमजूर सल्ला केंद्राच्या वतीने तयार केली. यानुसार बालमूर कामगारांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी १९८६ च्या महिला बालकामगार कायद्यानुसार पुढील ठिकाणी वालमजुर ठेवता येत नाही.

१. प्रवासी व मालवाहू रस्ते वाहतुक.
२. फटाके विक्री काम.
३. गॅरेज व लहान उद्योग.
४. रेल्वे स्टेशनवर खान-पान सेवा पुरवणे.
५. कत्तलखाने.
६. गोदीवरील कामे (बंदर).
७. स्फोटके, रसायने आणि ज्वालाग्राही पदार्थ.

८. रेल्वे रुळावरील काम इत्यादी.

९. खाणमाग.

१०.प्लॉस्टीक व फायवर ग्लासची कार्यशाळा.

११.धातु वितळण्याचे काम.

१२.हातमाग व यंत्र उद्योग.

वरील मुद्यांना अनुसरुन राष्ट्रीय बालमजूर पॉलीसीची सुरुवात १९८७ रोजी झाली. यापॉलीसीत पहिल्या टप्प्यात आरोग्यावर परिणाम होईल अशा ठिकाणी बालकांना काम करण्यास बंदी घालण्यात आली. महिला बालकामगार प्रतिबंध कायदा १९८६ नुसार वरील सर्व कामाच्या ठिकाणी बालमजूर कामाबर लावणे गुन्हा आहे."

**७. बालकामगार सुधारणा कायदा १९८६**

१९८६ च्या बालकामगार सुधारणा कायद्याने बालकामगारांच्या सर्वांगिण विकासासाठी व त्यांना इतर मुलांच्या बरोबरीने समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे. बालकामगार हे शारिरीक, मानसिकदृष्ट्या मजबूत व परिपक्व झालेले नसतात. लहान वयात म्हणजे ज्या वयात खेळण्याचे, बागडण्याचे व शिक्षणाचे धडे घ्यावयाचे असतात त्या वयात या मुलांना त्यांच्या क्षमतेपलीकडे कष्टाची कामे करुन स्वतःचा उर्दनिर्वाह करावा लागतो पण लहान वयातच काम केल्याने एकंदरीतच बालकाचा शारीरिक, मानसिक व बौध्दिक विकास मंदावतो व देशाचे भावी आधारस्तंभ म्हणून ओळखला जाणारा बाल वर्ग अनेक रोग व समस्याने ग्रास्त होतो. म्हणून १९८६ चा बालकामगार प्रथा प्रतिबंध व नियंत्रण कायदा करण्यात आला.

या कायद्यानुसार बालमजुरांच्या कामाचा वेळ, मोबदला इत्यादी बाबी विषयी नव्याने तरतुदी करण्यात आल्या आहेत. बालकामगार प्रथे विरोधी अनेक कायदे असून हो आजपर्यंत शासनाला बालमजुरांच्या समस्येवर आळा घालता आला नाही. परिस्थितीत व कामाच्या वेळेत बदल घडवून आणता येतो. त्याच बरोबर त्यांचे आरोग्य व शिक्षण लक्षात घेऊन ते सुधारण्यासाठी बालमजूर शाळा स्थापन केलेल्या दिसून येतात. कायदे प्रत्यक्ष थोड्याफार प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसून येतात. पण जर कडक धोरण अवलंबले गेले तर या समस्येच्या निर्मूलनासाठी समाज पुढे येईल. तसेच १९८६ च्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी सुधारित अधिनियम २०१६ हा कायदा करण्यात आला. २०१६ च्या कायद्यानुसार खालील प्रमाणे तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

१२ वर्षाखालील बालकास सर्वच व्यवसाय आणि प्रक्रियांमध्ये काम करण्यात बंदी घालण्यात आली आहे.

१८ वयोगटातील किशोरवयीन बालकास धोकादायक व्यवसाय आणि प्रक्रियांमध्ये कामगार ठेवणे हा फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.

फौजदारी गुन्ह्यासाठी मालकास सहा महिने ते दोन वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा किंवा रु. २० हजार ते रु. ५० हजार इतका दंड किंवा दोन्हीही.

गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास किमान १ ते ३ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा.

**सारांश**

समस्येचे निर्मूलन करण्यासाठी ७६ वाश्रम प्रकल्पांना राष्ट्रीय बालश्रम प्रकल्प योजनेच्या अंतर्गत मंजुरी मिळाली आहे. ज्याचा फायदा १५०,००० बालकामगारांना झाला आहे. १०५,००० बालकामगारांचे शाळेत समायोजन करण्यात आले. कामगार मंत्रालयाने राष्ट्रीय वालश्रम प्रकल्प योजना एन.सी.एल.पी. ६०० जिल्ह्यात राबविण्याचे नियोजीत केले आहे. सध्या हो योजना भारतामध्ये २५० जिल्ह्यात राबविण्यात येते. याबरोबरच धोकादायक खाणी आणि उद्योग अशा ५७ उद्योगावर काम करणाऱ्या बालकामगारांना काम करण्यास प्रतिबंद केले आहे. तसेच बालकामगारांचे पुढील जीवनमान उंचावण्यासाठी शाळेच्या माध्यमातून त्यांचे पुर्नभरण करण्यात येत आहे. यासाठी सर्वशिक्षा अभियानासारख्या सरकारी योजनादेखील राबविल्या जात आहेत.

**संदर्भग्रंथ**

१. डॉ.बी.एल. फडिया, राजनीति विज्ञान, प्रकाशन, प्रतियोगीता साहित्य सीरीज, आगरा,
२. डॉ. जोशी अंजली, संघटीत क्षेत्रातील बालकामगार, प्रकाशन, जोशी, औरंगाबाद
३. डॉ.शेख आर. के., बालकामगार समस्या व समाधान, प्रशांत, पब्लिकेशन, जळगांव
४. डॉ.जोशी अंजली, संघटीत क्षेत्रातील बालकामगार जोशी प्रकाशन, औरंगादाद,
५. मुलांच्या शिक्षण हक्काची हमी व बालकामगार निर्मूलन प्रकल्प, केरवाडी,
६. www.wikipedia.org